RNI क्रमांक - MHMUL/25/A1620
संपूर्ण महाराष्ट्रातून वितरित




# त्रिपिटक वार्ता

परिवर्तनाचं पहिलं पाऊल"

"परिवत्तनस्स पठमो पादो "

वर्ष १ ले, अंक १
पृष्ठे ४, मूल्य १०

साप्ताहिक

"पालि भाषेचे पुनरुज्जीवन आणि धम्म प्रचार प्रसारासाठी समर्पित" |

अनुक्रमणिका
२ संपादकीय
२."पालि शिकूया बाबासाहेबांसोबत!"
३. मुख्य लेख
३. कथा, शिलालेख
४. बातम्या
४. वाचकांच्या प्रतिक्रिया

कविता

पालि ही भाषा प्राचीन,
ज्ञानाचा ठेवा खरा,
बुद्धांच्या शब्दांनी रचला,
सुंदर अर्थाचा डोंगर सारा !
घराघरात पोहोचवू या,
तिचा गोडवा अमर,
प्रचार करू सर्वत्र,
पालिचा जयजयकार थोर!
शब्दांतून उमटे शांती,
मनाला भिडे ती गाणी,
पालिचा प्रकाश पसरवू,
टाकू अज्ञानाला पाणी.!
संस्कृतीचा वारसा जपू,
नव्या पिढीला देऊ दान,
पालि जागवू पुन्हा,
करू जगाला ज्ञानवान!
मा. सतीश पवार

बुद्धांचा एक सुंदर सुविचार
"शांती ही बाहेरून शोधण्याची गोष्ट नाही, ती आतून येते."



## "महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात द्या; देशभरात आंदोलन तीव्र"

गया (बिहार), भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झालेल्या पवित्र महाबोधी विहाराच्या ताब्यासाठी बौद्ध समाजाने देशभरात जोरदार आंदोलन छेडले आहे. बिहारमधील गया येथील हे यूनेस्को जागतिक वारसा स्थळ बौद्धांचा पवित्र वारसा असूनही त्याचे व्यवस्थापन बौद्ध समाजाकडे नाही, यावरून असंतोष वाढला आहे. आंदोलकांनी विहाराचे संपूर्ण व्यवस्थापन बौद्ध संघटनांकडे सोपवावे, या मागणीसाठी शांततापूर्ण मोर्चे काढले आहेत.

महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्लीसह अनेक राज्यांतून बौद्ध अनुयायी या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

"महाबोधी विहार हा आमचा धार्मिक वारसा आहे, त्याचा ताबा बौद्धांकडेच असावा," अशी ठाम भूमिका बौद्ध नेत्यांनी मांडली आहे. व्यवस्थापनात बौद्धेतर व्यक्तींचा सहभाग हा धार्मिक स्वातंत्र्याच्या विरोधात असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. यासोबतच महाबोधी विहार अधिनियमात सुधारणा आणि बौद्ध परंपरेनुसार जतनाची मागणीही पुढे आली आहे.

बिहार सरकारने अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, आंदोलनाचा वाढता जोर पाहता लवकरच चर्चेचा प्रस्ताव येऊ शकतो, अशी शक्यता आहे. आंदोलनकर्त्यांनी अहिंसा आणि संविधानिक मार्गाने लढा सुरू ठेवण्याचे आवाहन देशभरातील बौद्धांना केले आहे.

## त्रिपिटक वार्ता साप्ताहिक: क्रांतीची मशाल,परिवर्तनाचा पाऊल

पालि भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती एका संस्कृतीचे, इतिहासाचे आणि साहित्याचे जीवन आहे. ज्या देशाची भाषा नष्ट होते, त्या देशाची ओळख, त्याची परंपरा आणि त्याचे संपूर्ण अस्तित्वच हळूहळू लोप पावते. म्हणूनच, सामाजिक बदल आणि नव्या परिवर्तनाच्या या सुरवातीसाठी "त्रिपिटक वार्ता साप्ताहिक" हे एक अतिशय महत्त्वाचे विचारपीठ आहे. हे साप्ताहिक म्हणजे क्रांतीची मशाल आहे, जे अंधारात प्रकाश पाडते आणि परिवर्तनाचा मार्ग दाखवते.

आपल्या मातृभाषेचे संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे. पालि ही भाषा म्हणजे बौद्ध धम्माचा कणा आहे. ती आपल्या पूर्वजांची देणगी आहे, जी आपल्याला आपल्या मुळांशी जोडते. या साप्ताहिकाच्या माध्यमातून आपण केवळ भाषाच जपत नाही, तर बौद्ध धम्माच्या मूल्यांना, विचारांना आणि तत्त्वज्ञानाला जिवंत ठेवते हे साप्ताहिक म्हणजे बौद्ध धम्माचे हृदय आहे, जे प्रत्येकाच्या घरात असायलाच हवे. महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता, हे संपूर्ण भारतातील बौद्ध धम्माच्या प्रचाराचे आणि प्रसाराचे एक प्रभावी साधन आहे.

आजच्या वेगवान आणि बदलत्या जगात आपली भाषा, आपली संस्कृती आणि आपले विचार टिकवून ठेवण्यासाठी असे प्रयत्न आवश्यक आहेत. "त्रिपिटक वार्ता साप्ताहिक" हे फक्त एक साप्ताहिक नाही, तर एक चळवळ आहे—सामाजिक जागृतीची, वैचारिक क्रांतीची. प्रत्येकाने हे साप्ताहिक आपल्या घरात ठेवलेच पाहिजे, वाचलेच पाहिजे आणि त्यातून प्रेरणा घेतली पाहिजे. कारण ही आपली मातृभाषा आहे—माझी भाषा, तुमची भाषा, आपल्या सर्वांची ओळख.

चला, या साप्ताहिकाला आपल्या जीवनाचा हिस्सा बनवूया आणि बौद्ध धम्माच्या या मशालीला पुढे नेऊया. परिवर्तनाची सुरुवात आपल्या घरापासूनच होते—आणि ती सुरुवात आहे "त्रिपिटक वार्ता साप्ताहिक"!

## पालि भाषेच्या प्रचारासाठी साप्ताहिकाचा संकल्प – प.पू.बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ठेवा पुढे नेण्याचा वसा

पालि भाषा ही बुद्धांच्या धम्माची रक्षण करणारी भाषा आहे, भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या भाषेच्या अभ्यासाला आपल्या जीवनाचा आधार बनवला होता, कारण त्यांना बुद्धांच्या शिकवणींचा खरा अर्थ जनसामान्यांपर्यंत पोहोचवायचा होता. त्यांनी पालि भाषेची डिक्शनरी, जी सोळाव्या खंडात आज उपलब्ध आहे, तयार करून शब्दार्थ, भाषांतर, संवाद कौशल्ये आणि व्याकरण यांचे सखोल विश्लेषण मांडले. हे कार्य त्यांनी केवळ विद्वत्तेसाठी नव्हे, तर समाजाला समता, करुणा आणि बंधुत्वाचा मार्ग दाखवण्यासाठी केले. बाबासाहेबांनी धम्माचा हा गाळा आपल्याला दिला आणि तो पुढे नेण्याचा मार्ग खुला ठेवला.बाबासाहेबांनी पालि भाषेवर प्रभुत्व मिळवून तिच्या माध्यमातून 'द बुद्ध अँड हिज धम्म' सारखा ग्रंथ रचला, त्यांनी धम्माचे सार सर्वसामान्यांसाठी सुलभ केले. त्यांचा हा ठेवा आपण थांबवायचा नाही, तर पुढे न्यायचा आहे. या साप्ताहिकातून आम्ही पालि भाषेतील शब्द, त्यांचे अर्थ, व्याकरण आणि बुद्धांच्या उपदेशांचा गाभा मांडणार आहोत. हे साप्ताहिक एक धम्मपीठ ठरेल, जिथे पालि भाषेचा जागर होईल आणि धम्माच्या मूल्यांचा प्रसार होईल.

**आमचा संकल्प:**

या साप्ताहिकाच्या माध्यमातून आम्ही पालि भाषेला पुन्हा जिवंत करू, बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर चालू आणि धम्माचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवू. हे साप्ताहिक म्हणजे एक संवाद आहे तुमच्यासाठी, तुमच्याबरोबर आणि तुमच्याद्वारे. चला, पालि भाषेचा अभ्यास करूया, तिचा प्रसार करूया आणि बाबासाहेबांचे स्वप्न साकार करूया!" या साप्ताहिकाला तुमचा सहभाग आणि पाठिंबा हवाय. पालि भाषेच्या या प्रवासात आपण सर्वांनी एकत्र येऊन धम्माचा गाळा पुढे नेऊया! या प्रेरणेतूनच आपण पालि भाषेच्या प्रचार-प्रसारासाठी हे साप्ताहिक सुरू केले आहे. हे साप्ताहिक म्हणजे फक्त एक प्रकाशन नाही, तर बाबासाहेबांच्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे. पालि भाषेचा अभ्यास आणि प्रसार आजच्या काळात अधिकाधिक महत्त्वाचा ठरतो आहे, कारण आधुनिक शिक्षणात आणि दैनंदिन जीवनात ही भाषा मागे पडत चालली आहे. या साप्ताहिकाच्या माध्यमातून आम्ही पालि भाषेचे महत्त्व लोकांपर्यंत पोहोचवू इच्छितो, तिचा अभ्यास सोपा आणि रंजक करू इच्छितो आणि बुद्धांच्या धम्माला नव्या पिढीशी जोडू इच्छितो.

दिनांक:- १०/७/२०२५ रोजी "श्रावस्ती" बुद्ध विहार, बनवडी कॉलनी येथे ' आषाढ (गुरुपौर्णिमा)/ वर्षावास प्रारंभ दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. त्यामध्ये १) बोधि वृक्षाची पुजा व बुद्ध वंदना २) वंदना व सुत्तपठन .



३) आषाढ पौर्णिमा ( गुरू पौर्णिमा) चे बौध्द धम्मात महत्त्व या विषयावर धम्मदेसना आयु.मारुती गच्चे ४) वर्षावास प्रारंभ व वर्षावास म्हणजे काय या विषयावर धम्मदेसना आयु.राजाराम पाटणकर यांनी दिली या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर धम्म उपासक/ उपासिका उपस्थित होते. सर्वांचे आभार व धन्यवाद..! तसेच दर रविवारी वर्षावास निमित्ताने प्रवचन व धम्मचर्चा व धम्मदेसना होणार आहे.तरी सर्व धम्म उपासक/ उपासिका यांना विनंती करण्यात येते की, सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे ही विनंती.

## 🌸 त्रिपिटक वार्ता साप्ताहिकाचा भव्य उद्घाटन सोहळा 🌸

### 🔹 बौद्ध शिक्षण, संशोधन आणि समाज परिवर्तनाच्या दिशेने एक क्रांतिकारी पाऊल! 🔹

### 🌟 प्रमुख उद्घाटक व मार्गदर्शक


## मा. डॉ. भीमराव आंबेडकर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष – भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय अध्यक्ष – समता सैनिक दल

### (बौद्ध चळवळीतील प्रभावशाली आणि प्रेरणादायी नेतृत्व)

🎙 प्रमुख उपस्थित मान्यवर -

- संपादकीय मंडळाचे सदस्य:
- प्रा. डॉ. धम्मदीप वानखेडे
- प्रा. डॉ. प्रफुल्ल गडपाल
- प्रा. डॉ. कीर्तिराज लोणारे
- प्रा. रितेश ओव्हाळ
- प्रा. विजय मोहिते
- मा. अमित मेधावी
- मा. सतीश पवार
- आयु.स्वातीताई गायकवाड
- मा. अनिल सुरडकर

📅 दिनांक: सोमवार, २१ जुलै २०२५
🕕 वेळ: सायंकाळी ६:०० वाजता
📍 स्थळ:
बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस, आंबेडकर भवन,
१६१, गोकुळदास पास्ता रोड,
दादर (पूर्व), मुंबई – ४०००१४
💻 कार्यक्रमाचे ONLINE थेट प्रक्षेपण:
✅ ZOOM आणि YOUTUBE द्वारे कार्यक्रमाचे थेट प्रसारण केले जाणार आहे.
आपण या कार्यक्रमाला प्रत्यक्ष उपस्थित राहून किंवा ऑनलाईन माध्यमातून सहभागी होऊ शकता.



🌼 सप्रेम प्रेमपूर्वक सदिच्छा संदेश 🌼
"त्रिपिटक वार्ता" साप्ताहिकाच्या प्रथम अंकासाठी
आनंदा केशव सुरडकर यांच्याकडून,
"त्रिपिटक वार्ता" साप्ताहिकाच्या प्रथम अंकाला
मन:पूर्वक सदिच्छा!
हे साप्ताहिक समाजात धम्माची प्रज्ञा, करूणा आणि समता पसरवो,
हेच माझे धम्मदानाच्या माध्यमातून दिलेले हार्दिक शुभाशिर्वाद आहेत.
धम्माचा प्रसार आणि जनजागृती यासाठी हे साप्ताहिक एक दीपस्तंभ ठरो,
अशी मंगल कामना करतो .
🌿 सर्व धम्मसेवकांना धम्ममय सदिच्छा!
–आनंदा केशव सुरडकर

**आपली उपस्थिती कार्यक्रमाच्या यशात अमूल्य ठरेल!**
**> "धम्माची ज्योत तेवत ठेवूया, परिवर्तनाचा दीप पेटवत राहूया!**

त्रिपिटक वार्ता साप्ताहिक ✍ परामर्शदाता मंडळ - प्रा. (डॉ.) प्रफुल्ल गडपाल, प्रा.डॉ.धम्मदीप वानखेडे, डॉ. कीर्तिराज लोणारे, प्रा. विजय मोहिते. संपादकीय मंडळ काय अमित मेधावी, प्रा. रितेश ओव्हाळ, आयु. सतीश पवार, आयु. स्वातीताई गायकवाड

# विषय: पालि भाषा अध्ययन संधी आणि आव्हाने

**प्रा. रितेश ओव्हाळ**
**पालि व बौद्ध अध्ययन विभाग,**
**सा.फु.पु.वि. पुणे-४११००७**

पालि भाषा अध्ययनात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. पालि भाषा ही बौद्ध धर्मग्रंथांची मुख्य भाषा आहे आणि तिला प्राचीन भारतातील बौद्ध परंपरेशी जोडलेली असल्यामुळे महत्त्व आहे. बौद्ध साहित्य आपल्याला बौद्ध संस्कृत, चायनीज व तिबेटीयन या भाषांमधून देखील पाहायला मिळते मात्र आपण दैनंदिन वापरात पालि भाषेचा उपयोग जास्त प्रमाणात करतो नुकताच पालि भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला तेव्हापासून सर्वसामान्यांच्या मनात पालीबद्दल अधिक प्रश्न व कुतूहल निर्माण होऊ लागले त्यामुळे पालि भाषा व साहित्य त्यातील तत्वज्ञान तसेच पालि भाषा अभ्यासाच्या संधी आणि आव्हानांवर विचार करणे गरजेचे आहे.

**पालि भाषा अभ्यासाच्या संधी:**

बौद्ध धर्माचे ज्ञान: व्यक्तिगत व सामाजिक सर्वांगीण विकास

पालि भाषा शिकून त्रिपिटक व इतर पालि धर्मग्रंथांच्या अध्ययनामुळे. यामुळे बौद्ध तत्वज्ञान, तत्त्ववेत्ते, व आध्यात्मिक परंपरा समजून घेता येतात. त्यातून आपला व पर्यायाने समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. दोन हजार सहाशे वर्षांपुर्वी सांगितलेली बुद्धवचने आजच्या आधुनिक काळात देखील अत्यंत उपयुक्त वाटतात. आधुनिक काळात शिकवल्या जाणाऱ्या इतिहास, तत्वज्ञान, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र अशा अनेक विद्याशाखांना पाली साहित्याचे महत्वाचे योगदान लाभले आहे.

**ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा:**

पालि भाषा अभ्यासातून प्राचीन भारताचा सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा समजतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या Revolution and Counter Revolution या पुस्तकात त्यांनी भारताच्या इतिहासावर तसेच संस्कृतीवर भाष्य केले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या मते, बौद्ध धर्म हा भारतातील पहिला सामाजिक आणि धार्मिक क्रांतीचा टप्पा होता. भगवान बुद्धाने कर्मकांड, जातिव्यवस्था, आणि ब्राह्मणी श्रेष्ठत्वाचा विरोध केला. त्यांनी समानता, करुणा, आणि मानवतावाद यावर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बौद्ध धर्म हा लोकशाही मूल्यांवर आधारित होता आणि त्याने बहुजन समाजाला सामाजिक स्वातंत्र्य दिले. त्यांचे हे चिंतन बौद्ध धर्माच्या वैचारीक बैठकीवर आधारित आहे. पालि साहित्य प्राचीन भारताच्या सामाजिक, आर्थिक, आणि धार्मिक स्थितीचे महत्त्वाचे द्योतक आहे. यामधून तत्कालीन समाजाची जातिव्यवस्था, स्त्रियांची स्थिती, कुटुंबव्यवस्था, आणि शिक्षण यांची माहिती मिळते. आर्थिकदृष्ट्या व्यापार, शेती, आणि उद्योगधंद्यांचे वर्णन आढळते, तसेच धार्मिकदृष्ट्या बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान, अष्टांगिक मार्ग, आणि धार्मिक संस्थांचे महत्त्व अधोरेखित होते. या साहित्यातून प्राचीन भारताचे विविध पैलू समजून घेता येतात, ज्यामुळे त्याला ऐतिहासिक दृष्टिकोनातून मोठे महत्त्व आहे.

**विद्वत्तापूर्ण करिअर:**

पालि भाषेचे ज्ञान संशोधक, प्राध्यापक, अनुवादक, आणि सांस्कृतिक अभ्यासक अशा विविध क्षेत्रांत करिअरच्या संधी निर्माण करते. पाली साहित्य, बौद्ध धर्म, आणि प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासामुळे शैक्षणिक,
सांस्कृतिक, आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठित स्थान मिळवता येते. यामुळे विद्वत्तापूर्ण आणि समृद्ध करिअर घडवता येते. या विषयाचा अभ्यास करून फक्त त्याच भाषेत करिअर करता येते असे नसून कोणत्याही क्षेत्रात करिअर केले तरी पालि भाषेचा अभ्यास हा नक्किच पूरक म्हणून समजला जाऊ शकतो.

पूर्वी यू. पी. एस. सी. मध्ये एक विषय म्हणून मान्य असणारा विषय आता एम. पी. एस. सी. मध्ये देखील पालीला विषय म्हणून मान्यता मिळाली आहे.

**बुद्धविहारांमधून पालि भाषा अभ्यासवर्ग चालवणे**

बुद्धविहारांमध्ये पालि भाषा अभ्यासवर्ग चालवल्यास पालि भाषेचे जतन, प्रचार आणि संवर्धन होईल. या माध्यमातून धार्मिक ग्रंथांचा अभ्यास सुलभ होईल आणि बौद्ध धर्माचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवता येईल. सरकारी अनुदानावर अवलंबून न राहता मंडळ अथवा विहार कार्यकारिणी मार्फत नाममात्र शुल्कात सदर अभ्यासवर्ग चालवावेत जेणेकरून समाजातील नवीन मुलांना (शिक्षकांना) पाली शिकवण्याचा अनुभव प्राप्त होईल तसेच शाळा आणि महाविद्यालय स्तरावर पालि भाषेचा प्रसार व प्रचार होण्यास मदत होईल. समाजातून मोठ्या प्रमाणात निधी जमा होऊ शकेल व बुद्धविहारे नियमित भरलेली राहतील. सामाजिक निधीचा योग्य वापर होत असल्यामुळे देणग्या देणारांना समाधान वाटेल. अशा प्रकारे छोट्या छोट्या प्रमाणात पाली भाषेच्या प्रचाराचे कार्य झाल्यास भविष्यात चांगले जागतिक कीर्तीचे विद्वान, अभ्यासक निर्माण होण्यास मदत होईल. तसेच पालि भाषा आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचे शिक्षण प्रभावीपणे देता येईल. प्रशिक्षित शिक्षक, प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. संशोधन, अनुवाद, आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करता येईल. स्थानिक व आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि निधीमुळे हा उपक्रम प्रभावी होईल. पालि भाषा अभ्यासवर्ग बौद्ध परंपरेचे संवर्धन आणि समाजशिक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरू शकते.

**सरकारी योजनांची माहिती नसणे**

पालि भाषेतील शिक्षणाच्या आणि संशोधनाच्या अनेक संधी आपल्याला माहिती नसतात उदारणार्थ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा सहकार्य करार जपानमधील कानाझावा विद्यापीठासोबत आहे त्याचाच एक भाग म्हणून जपानमधील विद्यार्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात येऊन तसेच इथल्या विद्यापीठातील विद्यार्थी जपानमध्ये जाऊन शिक्षण घेऊ शकतो, संशोधन करू शकतो तसेच शिकवू देखील शकतो अशा अनेक शिष्यवृत्या आहेत ज्या दोन्ही सरकारमार्फत दिल्या जातात अशा प्रकारचे सामंजस्य करार हे जगातील अनेक विद्यापीठांसोबत असू शकतात त्याची माहिती घेण्याचे प्रयत्न आपण केले पाहिजेत. भारत सरकार द्वारे अजून एक शिष्यवृत्ती दिली जाते ति म्हणजे तुम्ही जर पाली भाषेचा अभ्यास केला आहे आणि तुम्हाला त्याआधारे पालि शिकवण्यासाठी एखाद्या शाळेत नियुक्ती दिली असेल तर महिना वीस हजार रुपये तुमच्या वेतनासाठी त्या शाळेला दिले जातील. अशा अनेक योजना चालू असतात पण त्यांची माहिती आपल्यापर्यंत कधी येतच नाही.

उच्च शिक्षणासाठी मानधन व शिष्यवृत्ती

पालिच्या अभ्यासकांना उच्च शिक्षण घेण्यासाठी तसेच संशोधन करण्यासाठी देशात व परदेशात अनेक संधी उपलब्ध असतात परंतु आपणापर्यंत काही कारणास्तव त्यांची माहिती येत नाही. आपण जर पालि विषयाचा अभ्यास सखोल केला आणि त्यावर संशोधन करण्याची आपली क्षमता व इच्छा असेल तर खूप मोठ्या प्रमाणात आपल्याला संधी उपलब्ध होऊ शकतात. पुण्यातील barti या सरकारी संस्थेमार्फत अशा विद्यार्थ्यांना अनुदान शिष्यावृत्ती दिली जाते तसेच केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या अनेक योजना आहेत त्यांचादेखील अभ्यासकांना लाभ घेता येऊ शकतो.

**आध्यात्मिक लाभ**

पालि भाषेतील ग्रंथ जीवन व्यवस्थापन, शांती, आणि ध्यान यासंबंधित तत्त्वज्ञानाने समृद्ध आहेत. अष्टांगिक मार्ग, चार आर्यसत्ये, आणि करुणा व ध्यानसाधनेच्या संकल्पना वैयक्तिक आणि मानसिक विकासासाठी उपयोगी ठरतात. या ग्रंथांमधील विचार व्यक्तीला अंतर्मुख होण्यास, मानसिक शांती मिळवण्यासाठी प्रेरित करण्यास, आणि जीवनातील समस्यांवर सकारात्मक दृष्टिकोन ठेवण्यासाठी मार्गदर्शन करतात. आध्यात्मिक हा शब्द ऐकल्यावर आपल्याला कर्मकांड किंवा व्रतवैकल्ये याच्याशी संबंध वाटू शकतो पण बौद्ध धर्मात त्याला स्थान नाही. बौद्ध विचार हा पूर्णपणे पारमार्थिक नसून तो व्यावहारिक देखील आहे.

**इतर भाषा आणि साहित्याचे अध्ययन**

पालि भाषेचा अभ्यास प्राकृत, संस्कृत, आणि इतर प्राचीन भाषांशी जोडलेला आहे. त्यामुळे या भाषांचे ज्ञान वाढवण्यास मदत होते. भाषाशास्त्राच्या अभ्यासासाठी पालि महत्त्वाची भूमिका निभावते, कारण ती प्राचीन भारतीय भाषांची ऐतिहासिक आणि तात्त्विक माहिती देते. पालीच्या अभ्यासातून विविध भाषांचे व्याकरण, शब्दसंपत्ती, आणि साहित्यिक शैली समजून घेण्यास मदत होते. इतिहास आणि साहित्याची आवड असणाऱ्यांना पाली भाषेचा अभ्यास उपयुक्त ठरू शकतो.

**पालि भाषा अभ्यासातील आव्हाने:**

**प्राचीन आणि दुर्बोध भाषा**

पालि भाषा हि मृतवत भाषा आहे कारण ती आजच्या काळात कुठेच बोली भाषा म्हणून प्रचलित नाही श्रीलंका, थायलंड किंवा म्यानमार मधील काही जंगलातील बौद्ध मठांचा अपवाद वगळता ती बोलली जात नाही. पालि भाषेत नव्याने कुठले लिखाण झालेले आपल्याला पाहायला मिळत नाही. पालि ही एक प्राचीन आणि दुर्बोध भाषा आहे, जी तिच्या विशिष्ट व्याकरण, विस्तृत शब्दसंपत्ती, आणि जटिल वाक्यरचनेमुळे अनेकांना कठीण वाटते. पालिचा अभ्यास करताना तिच्या भाषिक वैशिष्ट्यांमुळे वेळ आणि मेहनत लागते. यामुळेच पालिभाषा शिकण्यासाठी अभ्यासकांना विशेष प्रशिक्षणाची आणि मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्यामुळेच या भाषेचा अभ्यास करून योगदान करू शकतील असे अभ्यासक तयार होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

**मर्यादित संसाधने**

पालि भाषा शिकण्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या शैक्षणिक धोरणात समावेश आहे म्हणूनच इयत्ता पाचवी पासून पुढे विद्यार्थ्यांना पालि शिक्षणाची सोय करून देण्यात आली असून बालभारतीच्या माध्यमातून पालि भाषेचा अभ्यासक्रम व पुस्तके उपलब्ध करून दिली गेली आहेत मात्र शिक्षक उपलब्ध नाही, अनुदान नाही, प्राचीन भाषा शिकण्याचा उपयोग काय, त्यातून पोटापाण्याचा प्रश्न सुटणार आहे का? अशी कारणे सांगून शाळांमध्ये पाली विषय शिकवला जात नाही. खरे पाहिले तर दहावीला मेरीट मध्ये येणाऱ्या मुलांची यादी पहिली तर त्यात बहुसंख्य मुले संस्कृत विषय घेऊन मेरीट मध्ये येतात तीच गोष्ट पाली विषयाच्या बाबतीत घडू शकते संस्कृत च्या तुलनेत पाली शिकणे सोपे आहे. मुले लहानपणापासून पालिभाषा शिकले तर त्या विषयातील जागतिक कीर्तीचे विचारवंत, निष्णात तज्ञ निर्माण होतील. महाविद्यालय आणि विद्यापीठ पातळीवर शिकण्यासाठी उपलब्ध असलेल्या संसाधने मर्यादित आहेत. प्रादेशिक भाषेत पुस्तकांची संख्या कमी आहे. ऑनलाइन साहित्य बहुतेक वेळा इंग्रजी भाषेत असल्यामुळे त्याचा उपयोग करणे अडचणीचे वाटते, आणि विद्यापीठ महाविद्यालय स्तरावर हि भाषा शिकण्याची संधी फारशी उपलब्ध नसल्यामुळे अभ्यासकांना सुरुवातीच्या टप्प्यात अडचणींचा सामना करावा लागतो. या मर्यादांमुळे पाली शिकण्याची प्रक्रिया वेळखाऊ आणि आव्हानात्मक ठरते.

**उपयुक्त शैक्षणिक संस्था व शिक्षकांचा अभाव**

भारतामध्ये संस्कृत भाषेची अठरा विद्यापीठे व शैक्षणिक संस्थाने आहेत. संस्कृत भाषा शिकवली जाते अशा हजारो लाखो शाळा व महाविद्यालये पाहायला मिळतात. त्याच्या तुलनेत पालि भाषेचे संपूर्ण भारतात एकही विद्यापीठ नाही. भारतातील काही विद्यापीठांमध्ये पूर्वी संस्कृत, प्राकृत व पालि अशा तीन भाषा एकत्रित करून विभाग होते आणि आहेत पण पालि भाषा जाणकार प्राध्यापक भरती कधीही केली जात नव्हती आणि आजही केली जात नाही. औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, मुंबई येथील विद्यापीठांमध्ये पालि भाषा विषय जिवंत ठेवण्यासाठी मानधन तत्वावर शिक्षकांना काम करावे लागत आहे. इतर ठिकाणी पालि विषय शिकवलाच जात नाही तर मानधन तत्वावरील शिक्षकांचा प्रश्नच येत नाही. पालि, प्राकृत भाषांच्या नावावर आलेले सरकारी अनुदान त्या कारणासाठी न वापरता स्वतःच्या स्वार्थापोटी इतरत्र वळवले जातात त्यामुळे पाली,

**– पालि त्रिपिटक साप्ताहिक विशेष उपक्रम**
**साप्ताहिक अंतर्गत एक नवीन, अभ्यासपूर्ण आणि परीक्षाभिमुख उपक्रम या सदरात असेल**

✨ "पालि पकासो – इयत्ता बारावी : गद्य, पद्य, स्थूलवाचन व अपठित उतारे" यांचे सोप्या व सुस्पष्ट मराठी भाषेतील भाषांतर
🚩 डॉ. कीर्तिराज लोणारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसिद्ध होणार आहे.

🎯 **उद्देश**:
विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने अभ्यास अधिक सुलभ व समजण्यास सोपा व्हावा, यासाठी ही विशेष मालिकाच सुरू करण्यात येत आहे.
ही मालिका पालि अभ्यासक, शिक्षक, तसेच विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे.
📰 प्रत्येक आठवड्याला एक नवीन भाग त्रिपिटक या साप्ताहिकात प्रकाशित होईल.
📢 पालि भाषा शिकणाऱ्यांनी व अभ्यासकांनी याचा नक्की लाभ घ्यावा!

**१. तक्षशिला विश्वविद्यालय स्थापना आणि कालखंड:**

कालखंड: इ.स.पू. १००० ते इ.स. ४००.स्थापक: तक्षक (आंभी राजाचा पुत्र, नागराज).स्थान: सध्याच्या पाकिस्तानातील रावळपिंडीजवळ, पश्चिमेस २० मैल अंतरावर.नाव: तक्षशिला शहराच्या नावावरून विश्वविद्यालयाला तक्षशिला हे नाव देण्यात आले. वैशिष्ट्ये: तक्षशिला हे जम्बुद्वीपातील सर्वात प्राचीन विश्वविद्यालय मानले जाते.येथे ३२ विविध विषयांचे शिक्षण दिले जात असे, ज्यात साहित्य, कला, विज्ञान, वैद्यकशास्त्र, युद्धकला, ज्योतिष, तत्त्वज्ञान आणि धम्म यांचा समावेश होता.शिक्षण सर्वांसाठी मोफत होते, आणि विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि शिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नव्हते.विश्वविद्यालयाचे कुलपती आत्तेय होते, जे उच्च शिक्षण आणि शिस्त यासाठी प्रसिद्ध होते.शैक्षणिक पद्धती:तक्षशिलेत वैयक्तिक गुरु-शिष्य परंपरेवर आधारित शिक्षण पद्धती होती.विद्यार्थ्यांना गुरुंकडून प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळत असे, आणि प्रत्येक गुरु आपल्या शिष्यांना स्वतंत्रपणे शिकवत असे.येथे देश-विदेशातील विद्यार्थी येत असत, ज्यात आशिया खंडासह इतर खंडांतील विद्यार्थींचा समावेश होता.महत्त्व:तक्षशिला हे वैदिक आणि बौद्ध शिक्षणाचे केंद्र होते.येथील प्रसिद्ध विद्यार्थ्यांमध्ये चाणक्य (कौटिल्य), पाणिनी (संस्कृत व्याकरणकार) आणि जीवक (वैद्यकशास्त्रज्ञ) यांचा समावेश आहे.येथील शिक्षणाने भारताला ज्ञान आणि संस्कृतीच्या क्षेत्रात वैश्विक कीर्ती मिळवून दिली.

**२. नालंदा विश्वविद्यालय स्थापना आणि कालखंड:**

कालखंड: इ.स.पू. ७०० ते इ.स. १२३३.स्थापक: शुक्रादित्य हर्ष (हर्षवर्धन).स्थान: सध्याच्या बिहारमधील नालंदा जिल्ह्यात.वैशिष्ट्ये:नालंदा हे प्राचीन जगातील सर्वात प्रसिद्ध विश्वविद्यालय होते, ज्याची कीर्ती संपूर्ण आशिया आणि युरोपमध्ये पसरली होती.येथील वास्तू सात मजली होती, आणि यात अनेक विहारे (निवासस्थाने), संघाराम (ध्यान कक्ष) आणि ग्रंथालये होती.येथे १०,००० विद्यार्थी आणि १,५०० आचार्य होते, जे ३० विषयांचे अध्यापन करत होते.विश्वविद्यालयाचे कुलगुरू महास्थवीर शीलभद्र होते.शैक्षणिक पद्धती:येथे ६४ कला आणि १८ विद्या शिकवल्या जात होत्या, ज्यात बौद्ध तत्त्वज्ञान, वेद, तर्कशास्त्र, व्याकरण, वैद्यक, खगोलशास्त्र आणि गणित यांचा समावेश होता.

विद्यार्थ्यांना स्वतंत्र वसतिगृहे आणि अध्ययन कक्ष उपलब्ध होते.शिक्षण मोफत होते, आणि येथे प्रवेशासाठी कठोर परीक्षा घेतली जात असे.नालंदाचे ग्रंथालय, ज्याला धर्मगुंज म्हणत, हे प्राचीन जगातील सर्वात मोठे ग्रंथालय होते.महत्त्व:नालंदाला बौद्ध शिक्षणाचे प्रमुख केंद्र मानले जाते, परंतु येथे हिंदू, जैन आणि इतर धर्मांचे शिक्षणही दिले जात असे.प्रसिद्ध विद्वान जैसे नागार्जुन, आर्यदेव, आणि ह्वेन त्सांग (चिनी प्रवासी) यांनी येथे शिक्षण घेतले किंवा अध्यापन केले.१२व्या शतकात बख्तियार खिलजीच्या आक्रमणामुळे नालंदा नष्ट झाले. ............ पुढील भागात .. .. . . .
.

# प.पु.बोधिसत्व "डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथांमधील पालि भाषा, संभाषण व व्याकरण : एक अभ्यासमालिका"

🟦 📘 बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाने – पालि भाषा शिका
🟢 अंक 1: पालि भाषेचे महत्व आणि प्रारंभिक अभ्यास
📢 🌟 विशेष संदेश:
"पालि भाषा ही केवळ एक भाषा नसून, ती बुद्धांचा सत्यधम्म समजून घेण्याचे दार आहे.
बाबासाहेब आंबेडकरांनी पालि भाषेचा अभ्यास केवळ शास्त्र म्हणून केला नाही,
तर ती सामान्य जनतेपर्यंत पोचवण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या मार्गदर्शनातून आपणही
पालि भाषा आत्मसात करू शकतो."
🔷 या सदराचे प्रमुख उद्दिष्टे:
पालि भाषेचा मूलभूत परिचय देणे
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पालि भाषा विषयक योगदान लोकांपर्यंत पोचवणे
बौद्ध धम्म अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी पालि भाषेचा उपयोग कसा करावा हे शिकवणे
सामान्य माणसाला सोप्या शब्दांत पालि वाक्य, गाथा, नियम समजून घेता आणि
वापरता यावेत यासाठी मार्गदर्शन करणे
📚 बाबासाहेब आंबेडकरांचे पालि भाषेतील कार्य:

पालि शब्दकोश (Dictionary Work):
- बहुभाषिक शब्दकोश: Pali–English–Marathi–Gujarati–Hindi
- बौद्ध संज्ञा, नीतीसूत्रांचे अर्थ, व्युत्पत्ती स्पष्ट केली
- बौद्ध ग्रंथातील पारिभाषिक शब्दांचा संग्रह

पालि व्याकरण (Grammar):
- बाबासाहेबांनी धातु, उपसर्ग, प्रत्यय, लिंग, वचन, क्रियापदे, विभक्ती यांचा सखोल अभ्यास केला
- स्वतःची टिपणे तयार केली – जी आज अभ्यासकांसाठी मार्गदर्शक ठरतात

"
पालि संभाषण (Conversation):
- बोलता येईल अशी पालि शिकवण्याची बाबासाहेबांची इच्छा
- वाक्यरचना व संवादाचे उदाहरण त्यांनी दिले होते
- "धम्म समजून घेण्यासाठी पालि समजली पाहिजे" हे त्यांचे तत्त्व

🗂️ हे सदर कसे असेल?
🔷 पालि शब्दसंग्रह – शब्द + अर्थ + वाक्यातील वापर
🔷 पालि व्याकरण – दर आठवड्याला एक नियम आणि त्याचे सोपे उदाहरण
🔷 पालि संभाषण – दैनंदिन वापरातील वाक्ये (उदा: "तुम्हं कुसलं?" – तुम्ही ठीक आहात का?)
🔷 बाबासाहेबांचे उद्धरण – त्यांच्या लिखाणातून प्रेरणादायी वाक्ये
📩 संपूर्ण जनतेसाठी एक मॅसेज:
"पालि भाषा ही बौद्ध धम्माची जननी आहे. बाबासाहेबांच्या प्रेरणेतून ही भाषा सर्वसामान्यांनी शिकली पाहिजे.
ही भाषा तुमच्यापर्यंत आणणे हे आमचे कर्तव्य आहे. चला, एकत्र शिकूया – बोलूया – समजून घेऊया बुद्धाचा सत्यधम्म!

पालि संभाषणाचा भाग मराठीत अनुवादित करून दिला आहे. हा भाग Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches , (संभाषण – General Conversation) या संचातील आहे:

सामान्य संभाषण | साधारण सल्लापो (Pāli to मराठी अनुवाद)

1. Do you know Pali?
त्वं पालिभासं जानासि?
→ तू पालि भाषा जाणतोस का?
2. I know a little.
अहं थोकं जानामि.
→ मी थोडीशी जाणतो.
3. Are you able to converse in Pali?
सक्कोसि त्वं पालिभासाय सल्लपितुं?
→ तू पालि भाषेत बोलू शकतोस का?
4. Yes. I am able to converse a little.
आम, थोकं सल्लपितुं सक्कोमि.
→ हो, थोडं थोडं बोलू शकतो.
5. What is your name?
युय्हं नामं किं? किंमो नामेसि?
→ तुझं नाव काय आहे?



# बोधिसत्त्व की अन्तिम इच्छा

**-डॉ. प्रफुल्ल गड़पाल**
**एसोसिएट प्रोफेसर, बौद्ध दर्शन एवं पालि विद्याशाखा, केन्द्रीय संस्कृत विश्वविद्यालय, लखनऊ परिसर, लखनऊ**

बोधिसत्त्व कुशल-कर्मों और पुण्य-पारमिताओं के अर्जन से बुद्धत्व की ओर अग्रसर प्राणी होते हैं-यह सर्वविदित तथ्य है। बोधिसत्त्व बाबासाहब डॉ. भीमराव आंबेडकर जी के द्वारा किये गये ऐसे ही अनन्य-अथक प्रयासों से अनन्त मनुष्यों एवं प्राणियों का उद्धार हुआ। उन्होंने अनेक सामाजिक आन्दोलन चलायें तथा राजनीतिक स्तर पर अधःपतित दलितजनों को मानवीय-गरिमा दिलायी। उन्होंने समाज को बुद्धशासन के सार्वभौमिक धम्म-साम्राज्य में लाकर आध्यात्मिक उन्नति का महनीय राजमार्ग उद्घाटित किया। उन्होंने जिस भी कार्य को हाथ में लिया, उसे पूरा किया। उन्होंने अनेक ऐसे कार्य किये, जिन्हें एक व्यक्ति के द्वारा एक जीवन में करना असम्भव था। वस्तुतः वे अपने आप में एक संस्था थे। उन्होंने अनेक परिणामकारी कार्य किये; किन्तु दुर्योग से लम्बी बीमारियों के चलते एक इच्छा अब तक पूरी नहीं हो सकी; जिसे जानना-समझना और पूरा करने का प्रयास-प्रत्येक आंबेडकरवादी को करना परम आवश्यक है। संयोगतः उनकी एक अन्तिम इच्छा थी, जो अब तक अधूरी है।

क्या थी उनकी अन्तिम इच्छा?

भगवान् बुद्ध ने तात्कालिक जनभाषा पालि में अपने उपदेश दिये थे। इस भाषा में आज भी बुद्धवचन 'तिपिटक' के रूप में उपलब्ध होते हैं। किसी समय यह भाषा जम्बूद्वीप की सम्पर्क भाषा थी। मज्झिम-देश की विचार-विनिमय की भाषा होने के तो सुपुष्ट साहित्यिक एवं पुरातात्विक प्रमाण उपलब्ध हैं। प्राचीन काल में इस भाषा को मागधी भाषा कहा जाता था। साहित्य में इसे 'सुद्ध मागधी' के नाम से जाना जाता है। वैसे इसके अन्य नाम 'मूलभासा', 'तन्ति', 'पल्ली' तथा 'भारती' भी उपलब्ध होते हैं। इसे 'सक-निरुत्ति' (स्वक निरुक्ति/अपनी भाषा) भी कहा गया। पालि भाषा भारत से लुप्त हो गयी और पड़ोसी देशों में संजोकर रखी गयी। वर्षों तक इस भाषा में उपलब्ध साहित्य को संगायन-स्वाध्याय के माध्यम से पूर्ण प्रयत्नपूर्वक जीवित रखा गया। इस भाषा में साहित्य सर्जना भी आज तक चली आ रही हैं। श्रीलंका, बर्मा तथा थाईलैंड में लाखों हस्तलिखित पाण्डुलिपियाँ प्राप्त होती हैं। पालि को पढ़ने-समझने के लिए भी बहुत सारी पुस्तकें आधुनिक ढंग से लिखी गयीं। इन पुस्तकों में 'पालि भाषा का व्याकरण एवं डिक्शनरी' (Grammar and Dictionary of the Pali Language) एक अनूठी कृति है। इसके लेखक हैं-'बोधिसत्त्व बाबासाहब डॉ. भीमराव आंबेडकर', जिसे 'डॉ. आंबेडकर लेखन एवं भाषण' (Dr. Babasaheb Ambedkar Writings and Speeches) में वाल्यूम 16 में प्रकाशित किया गया है। 'यह उन महान् बोधिसत्त्व की अन्तिम कृति है।' इसकी रचना के पीछे आप बोधिसत्त्व का एक गहरा सन्देश है। सत्यतः बोधिसत्त्व के प्रत्येक कार्य में कोई महान् सन्देश सन्निहित होता है।

उन्होंने 'भारतीय संविधान' के माध्यम से समता, स्वतन्त्रता, न्याय एवं बन्धुत्व के मूल्य देकर मानवीय जीवन को सच्ची गरिमा प्रदान की। सच्चे अर्थों में मुक्ति के मार्ग उद्घाटित किये। 'बुद्ध-धम्म की दीक्षा' द्वारा मानव-मुक्ति तथा 'भगवान् बुद्ध और उनका धम्म' के माध्यम से आध्यात्मिकता के मार्ग पर चलते हुए शील-समाधि-प्रज्ञा द्वारा निब्बान के मार्ग पर अग्रेसर होने के लिए मानव-मानव को सम्प्रेरित किया। यह कार्य भवचक्र से मुक्ति का मार्ग है। इस अर्थ में महान् बोधिसत्त्व बाबासाहब का यह कार्य अनुपम एवं अद्वितीय है। 'पालि भाषा का व्याकरण एवं डिक्शनरी' का लेखन एक समाप्तप्राय भाषा को पुनरुज्जीवित करने का महान् स्वप्न ही था। उनका स्वप्न था कि 'पालि भाषा जनभाषा (Lingua franca) बने। लोग इस भाषा के माध्यम से आपस में विचार-विनिमय (Exchange of Ideas) करें। इस भाषा के द्वारा अपने दैनिक जीवन के कार्यों का निर्वाह करें।' इसी कारण उन्होंने इस पुस्तक में दैनिक प्रयोग के लिए सैकड़ों वाक्यों की रचना की। घर में, कार्यालय में, स्कूल में, रेलवे स्टेशन पर या अन्यत्र किस प्रकार इस भाषा के माध्यम से लोग बातचीत कर सकते हैं-ऐसे सैकड़ों वाक्यों का उन्होंने संकलन किया। किसी भी भाषा के प्रयोग से धीरे-धीरे वह भाषा जीवित स्वरूप प्राप्त कर लेती है। हिब्रु-भाषा इसका जीवन्त प्रमाण है। उन्होंने दैनिक प्रयोग की शब्दावली को 'शब्दकोष' में स्थान दिया। ऐसे ही 'पालि व्याकरण' के माध्यम से इस भाषा के व्याकरण-शास्त्र के व्याकरणों को गम्भीरता से पढ़ने-समझने का सन्देश प्रदान किया। इसका अध्ययन करने पर आप यह स्पष्ट समझ जायेंगे कि यह उनकी अपूर्ण कृति है। इस मायने यह उनकी अन्तिम कृति थी। वे इसे लिख ही रहे थे, नोट्स तैयार ही कर रहे थे। उन्हें उस समय अनेक बीमारियाँ हो चुकी थीं। गम्भीर बीमारियों के बावजूद उन्होंने इस पुस्तक का लेखन कार्य किया। क्या कारण रहा होगा?

नका सीधा सा सन्देश था कि समाज पालि भाषा को पढ़े तथा इसी भाषा में आपस में विचार-विनिमय करे। चूंकि किसी भी भाषा में संस्कृति समायी होती है। इस कारण संस्कृति के निर्माण के लिए भाषा की प्रमुखतः आवश्यकता होती है। अतः पालि को एक जीवित भाषा बनाना बोधिसत्त्व का प्रमुख लक्ष्य था। वे चाहते थे कि समाज इस भाषा को पढ़कर तिपिटक साहित्य का अध्ययन करे। तिपिटक साहित्य बुद्धवचन हैं। बुद्धवचन समाज को 'प्रबुद्ध समाज' बनाने के लिए आवश्यक साहित्य है। आज इस साहित्य को 'विश्व धरोहर' के रूप में स्वीकार किया जा रहा है। यदि आप बाबासाहब को मानते हैं, उनकी (बात) मानते हैं-तो पालि भाषा को सीखने का संकल्प लें। इस 'विश्व धरोहर' से जुड़ने का संकल्प लें।

विविध षडयन्त्रों के द्वारा इस समाज को दलित बनाया गया और शास्त्र-वचन के नाम पर उनके समस्त अधिकार छिन लिये गये। समाज की गरिमा और मनुष्य होने का भाव ही समाप्त हो चुका था। तब बोधिसत्त्व ने इस समाज को मानवीय गरिमा और अधिकार दिलाये। पाँच हजार वर्षों तक दबाया गया; उठने में भी लम्बा समय अवष्य लगेगा। कांटा चुभता है, तो दर्द लगता है; निकालने पर भी खून निकलता है, दर्द होता ही है। अब चाहे पचास साल लगे, पर हमें उठना। यदि हमने आज से पालि भाषा के उत्थान का संकल्प ले लिया, तो आने वाले समय में यह जन-भाषा बनकर रहेगी। आप धम्म का अच्छी तरह साक्षात्कार कर सकेंगे। चूंकि पालि भाषा में उपनिबद्ध बुद्धवचन सीधे तौर पर कहे गये हैं, कहीं कोई घुमाव-छिपाव नहीं; ना ही किसी बात को द्विअर्थ रूप में कहा गया है। अतः द्वितीय बुद्धशासन में हम सबका कर्तव्य है कि पालि को पढ़े, इसके प्रचार-प्रसार के लिए प्रयास करें।

''जने जने पालि, घरे घरे पालि।''

बोधिसत्त्व बाबासाहेब डॉ. भीमराव अम्बेडकर जी की अंतिम इच्छा को पूरा करने की ओर एक कदम बढ़ायें। 14 संकल्प जीवन में उतारें-

1. प्रति रविवार तथा छुट्टी के दिन अवष्य बुद्ध-विहार जायेंगे।
2. दिनभर में अधिकाधिक पालि षब्द तथा कम से कम 10 वाक्य पालि भाषा में बोलेंगे।
3. जनगणना के समय 'पालि भाषा को मातृ-भाषा' तथा 'धर्म में बौद्धधर्म' लिखवायेंगे।
4. पालि भाषा एवं साहित्य के प्रचार-प्रसार के लिए हर-सम्भव प्रयास करेंगे।
5. अपने बच्चों को पालि भाषा का अध्ययन करने के लिए प्रोत्साहित करेंगे।
6. अपने समस्त संस्कार पालि-भाषा के सुत्तों एवं गाथाओं के माध्यम से करायेंगे।
7. पालि आधारित पर्वों, उत्सवों एवं कार्यक्रमों को अपने जीवन का हिस्सा बनायेंगे।
8. पालि की संस्थाओं, संगठनों, समितियों अथवा संघों का निर्माण करके प्रचार-प्रसार करेंगे।
9. पूर्णिमाओं के अवसर पर उपोसथ-व्रत लेते हुए आठ शीलों का पालन करेंगे तथा पालि सुत्तों का संगायन करेंगे।
10. धम्मपद के संगायन को अपने जीवन का अहम हिस्सा बनायेंगे।
11. बुद्ध-विहारों में धम्म, पालि एवं विविध शिल्प-कलाएँ सीखने-सिखाने की व्यवस्था करेंगे।
12. स्वयं पालि सीखेंगे तथा दूसरों को भी पालि भाषा सिखायेंगे।
13. पालि के प्रचार-प्रसार एवं संवर्धन के समस्त कार्यों में उत्साहपूर्वक सहयोग करेंगे।
14. अपने गांव-शहर या तालुका के सरकारी स्कूल या कॉलेज में पालि की पढ़ाई शुरु कराने के लिए भरसक प्रयास करेंगे।



**मनाचा मार्ग: यमकवग्ग आणि धम्मपदाचे तत्त्वज्ञान**
**मन के मार्ग: यमकवग्ग और धम्मपद की शिक्षाएँ**
**The Path of the Mind: Insights from Yamakavagga and Dhammapada**

गाथा १
पालि मूल:
मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया।
मनसा चे पदुट्ठेन, भासति वा करोति वा।
ततो नं दुक्खमन्वेति, चक्कं व वहतो पदं॥
मराठी अनुवाद:
सर्व मानसिक अवस्था मनामुळे उद्भवतात,मन त्यांचे प्रमुख आहे, मनोमय आहे।जर कोणी दूषित मनाने बोलले किंवा काही केले, तर दुःख त्याच्या मागे येतं, जसं गाडीचं चाक बैलाच्या पायांमागे जाते.
हिन्दी अनुवाद:
सभी मानसिक अवस्थाओं का अगुवा मन है,मन ही उनका प्रधान है, वे सभी मनोमय हैं। यदि कोई व्यक्ति दूषित मन से कुछ बोलता या करता है, तो दुःख उसके पीछे वैसे ही चलता है, जैसे गाड़ी का पहिया खींचने वाले बैल के पैर के पीछे-पीछे चलता है।
अंग्रेजी अनुवाद:
All mental states are preceded by the mind, led by the mind, made by the mind. If one speaks or acts with a corrupt mind, suffering follows, like the wheel follows the foot of the ox pulling the cart.

गाथा २
पाली मूल:
मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया।
मनसा चे पसन्नेन, भासति वा करोति वा।
ततो नं सुखमन्वेति, छाया व अनपायिनी॥
मराठी अनुवाद:
सर्व मानसिक अवस्था मनामुळे उद्भवतात, मन त्यांचे प्रमुख आहे, त्या सर्व मनोमय आहेत।जर कोणी प्रसन्न मनाने बोलले किंवा काही केले, तर सुख त्याच्या मागे येतं, जसं अविचल सावली मागे येते.
हिन्दी अनुवाद:
सभी मानसिक अवस्थाओं का अगुवा मन है, मन ही उनका प्रधान है, वे सभी मनोमय हैं। यदि कोई व्यक्ति प्रसन्न मन से कुछ बोलता या करता है, तो सुख उसके पीछे वैसे ही चलता है, जैसे कभी न हटने वाली छाया।
अंग्रेजी अनुवाद:
All mental states are preceded by the mind, led by the mind, made by the mind. If one speaks or acts with a pure mind, happiness follows, like an inseparable shadow.

शब्द अर्थ:
मनोपुब्बङ्गमा (Manopubbaṅgamā)
मराठी: मनाने आधी जाणारे (मन + पुब्ब + गमा: मन आधी जाते).

धम्मा (Dhammā)
मराठी: धम्म, मानसिक अवस्था, घटना किंवा सत्य.
हिंदी: धर्म, मानसिक अवस्थाएँ, सत्य या घटनाएँ.
इंग्रजी: Mental states, phenomena, or truths
याच्या पुढील शब्द पान क्र 4 वर आहेत ................

# झेन कथा

"पारस आणि  भाषेची जादू"


एक छोटेसे गाव होते, जिथे लोक साधे आणि शांत जीवन जगत होते. त्यात एक तरुण मुलगा होता, पारस.
पारस एक अभ्यासू युवक होता, पण त्याला त्याच्या जीवनात एक ठराविक दिशा शोधायची होती. एक दिवस तो गावातील वृद्ध गुरुजींना भेटायला गेला.
गुरुजींनी पारसला विचारले, "पारस, तु कोणत्या गोष्टीचा शोध घेत आहेस ?"

पारस म्हणाला, "गुरुजी, मी जीवनाच्या गूढतेचा शोध घेत आहे. माझ्या मनाला शांती आणि मार्गदर्शन हवे आहे, पण मला कुठेही तो मार्ग दिसत नाही."
गुरुजी हसून म्हणाले, "तुम्ही बौद्ध धम्म आणि  भाषेची ओळख करून घ्या.  ही एक प्राचीन भाषा आहे, जी बुद्धाचा उपदेश व्यक्त करण्यासाठी वापरली जात होती. तील तत्त्वज्ञान आणि ध्यानाच्या पद्धतींमध्ये जीवनाच्या गूढतेचे उत्तर आहे."
पारस थोडा गोंधळलेला होता, "गुरुजी,  भाषा आणि बौद्ध तत्त्वज्ञान हे कसे आपल्याला मदत करू शकतात?"
गुरुजींनी सांगितले, "पालि भाषेच्या माध्यमातून, तुम्ही बुद्धांच्या शब्दांना शुद्ध रूपात समजू शकता. 'चार आर्य सत्य' आणि 'आर्य अष्टांगिक  मार्ग' यांचा अभ्यास करून तुम्हाला जीवनातील दुःख आणि त्याचे निवारण कस करायचा, हे समजून येईल. हे सर्व विचार, बुद्धांच्या शिकवणुकीतून तुमच्या अंतःकरणाला शांती आणि समज देईल."
पारसने शंकेनं विचारले, "पण गुरुजी, आजकाल  भाषा शिकणारे लोक कमी आहेत. आपल्याला त्या भाषेच्या महत्त्वाचा प्रसार कसा करावा?"

गुरुजींच्या चेहऱ्यावर एक शहाणपणाची हसू उमटली. "पारस, विचार कर, आपल्या जीवनात जेव्हा आपल्याला एक दृष्टी मिळते, तेव्हा ती इतरांना दाखविण्याची जबाबदारी देखील आपल्यावर येते.  भाषेचा प्रचार करून, आपल्याला एक दृष्टी मिळेल जी लाखो लोकांना मदत करू शकते. जर प्रत्येक जण त्या शब्दांना जीवनात उतारतो, तर त्याच्या आंतरिक शांतीच्या आणि समृद्धीच्या दिशेने तो एक पाऊल पुढे जाईल."
अशीच काही विचारांची बियाणे पारसच्या मनात रुजली. त्याने ठरवले की, तो  भाषेच्या शिकवणीचे महत्त्व लोकांना समजावून देईल. तो एक छोटेसे शिबिर आयोजित करू लागला, जिथे बौद्ध तत्त्वज्ञानाच्या गोष्टी, ध्यान आणि  भाषा शिकविण्याचे कार्य सुरू झाले.

वाढत्या काळानुसार, पारसच्या गावात आणि आसपासच्या क्षेत्रात लोक  भाषेची शिकवण घेत होते. प्रत्येक व्यक्तीला शांती, समज, आणि अंतःकरणातील समाधान मिळवायला मदत मिळू लागली. पारस नेहमी सांगत असे, "ज्याला जीवनाच्या गूढतेचे उत्तर हवे आहे, तो  भाषेच्या साधनांचा उपयोग करू शकतो. हे शब्द फक्त शब्द नसून एक पद्धत आहे जी आपल्याला वास्तविक शांतीकडे घेऊन जातात."

ही कथा दर्शवते की  भाषा आणि बुद्धाचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक ज्ञानासाठी नाही, तर जीवनातील गूढतेच्या आणि मानसिक शांतीच्या शोधासाठी एक साधन ठरू शकते.  भाषेचा प्रचार, समाजाच्या भल्यासाठी आणि शांतीसाठी एक महत्त्वपूर्ण कार्य होऊ शकतो.





# शिलालेख, धम्म आणि सम्राट अशोक: इतिहासाचे जिवंत दस्ताऐवज

## धम्मलिपी आणि सम्राट अशोक यांचं नातं

**सम्राट अशोक (इ.स.पूर्व ३रा शतक) हे मौर्य साम्राज्याचे महान सम्राट होते. त्यांच्या काळात बौद्ध धम्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला आणि त्यांनी धम्माच्या प्रचारासाठी शिलालेखांचा उपयोग केला.**

**धम्मलिपी म्हणजे काय?**

**धम्मलिपी ही एक व्यापक संकल्पना आहे, जी सम्राट अशोकाच्या शिलालेखांशी संबंधित आहे. अशोकाने आपल्या शासनकाळात अनेक शिलालेख कोरले, जे मुख्यतः धम्मलिपी आणि खरोष्टी लिपींमध्ये होते. या शिलालेखांमध्ये 'धम्म' (म्हणजेच नैतिकता, सद्गुण आणि धार्मिक आचरण) यासंबंधी शिकवण दिली आहे. त्यामुळे या लिपींना 'धम्मलिपी' असे संबोधले जाते.**

**सम्राट अशोक आणि धम्मलिपीचे नाते:**

**1. धम्म प्रचाराचा भाग: अशोकाच्या धम्मलिपींमध्ये अहिंसा, सहिष्णुता, करुणा आणि सर्व धर्मांचा सन्मान यासारख्या शिकवणी आहेत.**
**2. शिलालेखांद्वारे संदेश: त्यांनी आपल्या आदेशांना लिपीबद्ध करून स्तंभ आणि शिलालेखांद्वारे लोकांपर्यंत पोहोचवले.**
**3. बौद्ध धम्माचा प्रसार: या लिपींमधून त्यांनी बौद्ध धम्माचा प्रचार केला आणि त्याला जनमानसात रुजवले.**
**4. धम्मलिपी आणि खरोष्टी लिपीचा वापर: त्यांच्या काळात मुख्यतः धम्मलिपी लिपीचा प्रसार झाला, जी भारतीय लेखनपद्धतींची आद्य लिपी मानली जाते.**

**यामुळे 'धम्मलिपी' हा शब्द अशोकाच्या शिलालेखांशी आणि त्यांच्या धम्म प्रचाराशी संबंधित आहे.**
**प्रत्येक आठवड्याला या सदर मधुन सम्राट अशोक आणि त्यांच्या शिलालेखा विषयी सांगितल्या जाईल**






## लासलगाव येथे आषाढ पौर्णिमा निमित्त धम्मप्रवचन व सामूहिक वंदना कार्यक्रम संपन्न

स्थळ: नालंदा बुद्ध विहार, लासलगाव
आयोजक: भारतीय बौद्ध महासभा, निफाड तालुका शाखा
आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या पवित्र वर्षावास कालावधीनिमित्त नालंदा बुद्ध विहार, लासलगाव येथे धम्मप्रवचन व सामूहिक वंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमात बौद्धाचार्य प्रकाश संसारे यांनी "भगवान गौतम बुद्धांचे पहिले प्रवचन" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यासोबतच जनसुरक्षा कायदा यावरही त्यांनी माहिती दिली. डॉ. चारुदत्त आहिरे यांनी त्रिशरण, पंचशील, क्षमायाचना यांचा अर्थ स्पष्ट करत सम्यक संमुद्ध याविषयी उपस्थितांना प्रबोधन दिले. कार्यक्रमाची सुरुवात ध्यान साधनेने झाली व नंतर सामूहिक वंदना घेण्यात आली. उपस्थितांनी प्रभू बुद्धाची प्रतीमा पूजन करून श्रद्धा अर्पण केली.कार्यक्रमाच्या शेवटी बौद्धाचार्य निलेश निळे यांनी सर्वांचे आभार मानले.

🌼 कार्यक्रमास उपस्थित मान्यवर व कार्यकर्ते:
विठ्ठल निळे, अशोक गायकवाड, मनोहर पगारे, भास्कर शेजवळ, आरतीताई भालेराव (यशोधरा व रमाई महिला मंडळ), सुशिला शेजवळ, शिला आहिरे, रेखा गायकवाड, विमल पगारे, सुशिला गायकवाड, माया केदारे, रमणताई शेजवळ, सुनिता संसारे, ललिता बागुल, ज्योती संसारे आदींची उपस्थिती लाभली.
धम्मप्रसारासाठी झालेला हा कार्यक्रम उपस्थितांमध्ये आनंददायी व प्रेरणादायी ठरला.



## "एक व्यक्ती, एक मिशन – समाज परिवर्तनाची सुरुवात!"

जी आपल्या समाजात खऱ्या अर्थाने परिवर्तन घडवणारी आहे.
✍🏻 संदीप सुरेंद्र शिंदे, रा. मोडनिंब, ता. माढा, जि. सोलापूर —
हे पेट्रोल पंपावर काम करणारे एक सामान्य कर्मचारी आहेत.
पण त्यांनी आपल्या साध्या जीवनातून असाधारण कार्य सुरू केले आहे.
🎓 त्यांनी सोलापूर विद्यापीठातून एम.ए. पालि हे शिक्षण घेतलं आणि बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार व्हावा यासाठी मोडनिंब व परिसरातील गरीब, श्रमिक कुटुंबातील मुला-मुलींना मोफत शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला आहे.
📘 त्यांचे कार्यक्षेत्र:
- दर रविवारी मोफत पालि भाषा वर्ग
- धम्म लिपी, मोडी लिपी, अनापान सती, व बौद्ध संस्कार शिकवणे
- विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पुस्तके, कपडे पुरवणे
- बालकामगार मुलींना शिक्षणात सहभागी करून घेणे
- जयंती, पुण्यतिथी, वाढदिवस साजरे करताना धम्म अभ्यास
- विद्यार्थ्यांना बुद्ध वंदना, गाथा पाठ करून कार्यक्रमात सहभागी करणे
- पालकांना मुलींच्या शिक्षणासाठी प्रेरित करणे
- स्वतःच्या पगारातील एकतृतीयांश भाग या कार्यासाठी खर्च करणे

🎭 त्यांच्याकडील विद्यार्थ्यांनी "हंस हा कोणाचा?"
ही 10 मिनिटांची नाटिका पालि भाषेत सादर केली होती, जी यूट्यूबवरही पाहायला मिळते. सध्या ते डॉ. सुगंध वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पालि सुत्त पठनाचे शिक्षण घेत आहेत आणि भविष्यात NET परीक्षा देऊन सहाय्यक प्राध्यापक होण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. त्यांना समाजातील काही राजकीय लोक, स्वयंघोषित नेते आणि काही पालकांचा विरोध असला तरी त्यांनी एकही दिवस हे कार्य थांबवलेले नाही.संदीप शिंदे सरांचं हे काम केवळ शिक्षण नव्हे, तर समाज परिवर्तनाचं महान कार्य आहे.
आपण त्यांच्या कार्याला शुभेच्छा द्याव्यात आणि शक्य असल्यास अशा उपक्रमात मदत करावी, हाच उद्देश या पोस्टमागे आहे.

मनोसेट्ठा (Manoseṭṭhā)
मराठी: मनाने श्रेष्ठ (मन + सेट्ठ: श्रेष्ठ).
हिंदी: मन से श्रेष्ठ (मन + श्रेष्ठ).
इंग्रजी: Led by the mind (mind + supreme).
मनोमया (Manomayā)
मराठी: मनाने बनलेले (मन + मया: बनलेले).
हिंदी: मन से निर्मित (मन + मय).
इंग्रजी: Made by the mind (mind + made).
मनसा (Manasā)
मराठी: मनाने (मनाचा वापर करून).
हिंदी: मन से (मन के द्वारा). इंग्रजी: With the mind.
चे (Ce)
मराठी: जर (संन्यासिक शब्द, सशर्त).
हिंदी: यदि (सशर्त). इंग्रजी: If (conditional).
पदुट्ठेन (Paduṭṭhena)
मराठी: दूषित, अशुद्ध किंवा खराब (मनाच्या संदर्भात).
हिंदी: दूषित, अशुद्ध या खराब (मन के संदर्भ में).
इंग्रजी: Corrupt, impure, or defiled
भासति (Bhāsati) मराठी: बोलतो. हिंदी: बोलता है.
इंग्रजी: Speaks. वा (Vā), मराठी: किंवा
हिंदी: या (विकल्प दर्शाता है).
इंग्रजी: Or (indicating an alternative).
करोति (Karoti)- मराठी: करतो (कृती करणे).
हिंदी: करता है (कार्य करना). इंग्रजी: Acts or does.
ततो (Tato) - मराठी: त्यामुळे, त्या नंतर.
हिंदी: इसलिए, उसके बाद.
इंग्रजी: Hence, thereafter.
नं (Naṃ)- मराठी: त्याला (त्या व्यक्तीला).
हिंदी: उसे (उस व्यक्ति को).
इंग्रजी: Him/her (the person).
दुक्खं (Dukkhaṃ), मराठी: दुःख, वेदना.
हिंदी: दुख, पीड़ा. इंग्रजी: Suffering, pain.
अन्वेति (Anveti)- मराठी: मागे येतो, अनुसरण करतो.
हिंदी: पीछा करता है, अनुसरण करता है.
इंग्रजी: Follows.
चक्कं (Cakkaṃ)- मराठी: चाक (गाडीचे).
हिंदी: पहिया (गाड़ी का).
इंग्रजी: Wheel (of a cart).
व (Va)- मराठी: जसे (उपमा दर्शवतो).
हिंदी: जैसे (उपमा दर्शाता है). इंग्रजी: Like (simile).
वहतो (Vahato)- मराठी: खेचणाऱ्या (बैलाच्या संदर्भात).
हिंदी: खींचने वाले (बैल के संदर्भ में).
इंग्रजी: Of the pulling (ox).
पदं (Padaṃ)- मराठी: पाऊल (बैलाचे).
हिंदी: पैर (बैल का). इंग्रजी: Foot (of the ox)

पसन्नेन (Pasannena)
मराठी: प्रसन्न, शुद्ध किंवा निर्मळ (मनाच्या संदर्भात).
हिंदी: प्रसन्न, शुद्ध या निर्मल (मन के संदर्भ में).
इंग्रजी: Pure, clear, or serene (in the context of the mind).
सुखं (Sukhaṃ), मराठी: सुख, आनंद. हिंदी: सुख, आनंद. इंग्रजी: Happiness, bliss.
छाया (Chāyā)
मराठी: सावली. हिंदी: छाया. इंग्रजी: Shadow.
अनपायिनी (Anapāyinī)
मराठी: न कधी दूर जाणारी (सावलीच्या संदर्भात).
हिंदी: कभी न छोड़ने वाली (छाया के संदर्भ में).
इंग्रजी: Inseparable, never departing (in the context of a shadow)




### धम्मदेसना कार्यक्रमात डॉ. यशकाश्यपायन यांचे प्रतिपादन — "पंचशीलाच्या आचरणानेच जगात शांतता नांदेल"

गारगोटी (प्रतिनिधी) – "पंचशीलाच्या आचरणानेच जगात शांती आणि सुख नांदू शकते. यासाठी प्रत्येकाने धम्माचे आचरण करणे अत्यंत आवश्यक आहे," असे स्पष्ट प्रतिपादन ज्येष्ठ भिक्खू, पालि भाषेचे गाढे अभ्यासक भन्ते डॉ. यशकाश्यपायन यांनी केले. अमरनाथ वसतिगृह, गारगोटी येथे आयोजित वर्षावासानिमित्त पार पडलेल्या धम्मदेसने कार्यक्रमात ते उपस्थित उपासकांना मार्गदर्शन करत होते.आपल्या धम्मदेसनेच्या प्रारंभी त्यांनी पंचशील आणि अष्टांगिक मार्ग याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी ध्यानसाधना, मंगल मैत्री, उपोसथ पाळणे, अष्टशील धारण याविषयी उपासकांना स्पष्ट माहिती दिली. "वर्षावासाच्या काळात प्रत्येक बौद्ध बांधवाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर रचित 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ ३५ वेळा वाचावा, कारण बाबासाहेबांनी हा ग्रंथ लिहिण्यास ३५ वर्षे खर्ची घातली आहेत. भगवान बुद्धांचा धम्म सामान्य बहुजन समाजाला समजावा म्हणून बाबासाहेबांनी त्रिपिटकाचा अभ्यास करून हा ग्रंथ तयार केला, हे खूप मोठे कार्य आहे," असेही त्यांनी सांगितले."प्रत्येक रविवारी विहारात जाऊन धम्मग्रंथांचे वाचन करावे," असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले.
धम्मदेसनेनंतर उपस्थित उपासकांनी विचारलेल्या प्रश्नांना भन्ते डॉ. यशकाश्यपायन यांनी समर्पक उत्तरे दिली.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत सरदेसाई यांनी केले. दीपप्रज्वलन उपसिका सुमन दीक्षित, सुनिता कांबळे, संध्या लांडगे यांच्याहस्ते करण्यात आले.या कार्यक्रमास प्रा. डी. ए. माने, उपसिका जयंती माने, के. वाय. धम्मरक्षित, सामंत काका, पी. एन. कांबळे, साताप्पा कांबळे, बाबासाहेब कांबळे, प्रविणा बोरवडेकर, इंद्रायणी धम्मरक्षित आदी उपासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार गुलाब लांडगे सर यांनी मानले. कार्यक्रमानंतर उपस्थितांना खीर दान करण्यात आली.



धम्मदूत मैत्री संघ दिघी रोड भोसरी पुणे.
आषाढ पौर्णिमा (गुरुपौर्णिमा) वर्षवास प्रारंभ खूप मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.
प्रीतीताई रोकडे, शिल्पाताई धवणे व सुषमा ताई सरदार यांनी आषाढ पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.
बेडसे लेणी आदरणीय गुरुवर्य बुद्धघोष महाथेरो यांच्याकडून दोन-तीन महिलांनी अष्टशील उपोसत घेतले. त्यामध्ये पंचशीला ताई मस्के यांनी विहारांमध्ये बोलताना सांगितले की अष्टशील उपोसत का घ्यावे व दान का करावे यांच्यावर खूप छान मनोगत व्यक्त केले.
प्रमुख पाहुणे म्हणून बोधाचार्य कैलास पाटील साहेब उपस्थित होते. पाटील साहेबांनी वर्षवास म्हणजे काय वर्षवास या विषयावर खूप छान धम्मदेसना देऊन तेथे उपस्थित असलेले श्रद्धावान उपासक उपासकांना प्रश्न उत्तराच्या द्वारे वर्षवास काय हे समजावून सांगितले.
धम्म हा आचारणीक आहे व तो आध्यात्मिक मार्गाने कसा जगावा समजून सांगितले.
आदरणीय धम्मचारी कर्मसिद्धी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व अशोक गायकवाड साहेब यांनी शुभेच्छा दिल्या व राजूभाऊ हिवराळे यांनी आभार मानले.
या विहारांमध्ये रोज सायंकाळी 7.00 ते 8.30 या वेळेत रोज वंदना, धम्मपदाची गाथा, ध्यान व बुद्ध आणि धम्म या ग्रंथाचे वाचन चालू आहे.



भारतीय बौध्य महासभा , बदलापूर ता. अंबरनाथ जी, ठाणा, वर्षावास व, धम्मं प्रवचन मालिका 2025 कात्रप बुद्ध विहार येथे आयोजित करण्यात आलेली आहे त्याचे पहिले पुष्प आदरणीय, सुनंदाताई पवार के दिय प्रशिसन विभाग यांचे फारच मोलाचे मार्गदर्शन मिळाले अध्यक्ष आयु सुनील क्षीरसागर गुरुजी यांच्या मार्गदर्शन खाली कार्यक्रम झाला उद्घटन आदर , संतोष गायकवाड यांचे हस्ते झाले आभार पवार गुरुजींनी मानले कार्यक्रम परपडण्याची उत्तम नियोजन लाठे गुरुजी यांनी पारपाडली केंद्रय शिषक उत्तम कांबळे गुरुजी यांनी शुभेच्छा दिल्या

### त्रिपिटक वार्ता – पालि भाषेच्या प्रचारासाठी समर्पित साप्ताहिक!

बौद्ध विहार, धम्मसेवक आणि संघटना यांची माहिती पाठवा!
"त्रिपिटक वार्ता – पालि भाषेच्या मराठी साप्ताहिकामध्ये"
आम्ही दर आठवड्याला खालील समाजप्रबोधनात्मक विभाग चालू करत आहोत:
🔹 १. विहार परिचय विभाग 🔹 २. धम्मसेवक (धम्मकार्य करणाऱ्या व्यक्तींचा परिचय)
🔹 ३. बौद्ध धार्मिक संघटना परिचय
माहितीमध्ये खालील तपशील असावा:
🔸 विहारासाठी: विहाराचे नाव, स्थान, स्थापनेचा इतिहास, प्रमुख भंते/सेवकांचे नाव उपासना, शिबिरे, विशेष कार्यक्रम, एक फोटो (विहार/कार्यक्रमाचा)
🔸 धम्मसेवकासाठी: नाव, शहर, कार्यक्षेत्र, प्रेरणा, योगदान, एक फोटो
🔸 संघटनेसाठी: संघटनेचे नाव, स्थापना वर्ष,उद्दिष्ट, प्रमुख कार्य, विशेष प्रकल्प/कार्यक्रम, एक फोटो (कार्यक्रम/बॅनर) 📩 ही माहिती खालील WHATSAPP नंबरवर पाठवा:
📱 9139509355 📅 दर आठवड्याला नवीन माहिती प्रसिद्ध केली जाईल.
लवकरात लवकर आपली माहिती पाठवा! "आपल्या योगदानातून उजळेल त्रिसरण आणि पाली भाषेचा दीप!" त्रिपिटक वार्ता – पालि चा प्रचार, धम्माचा प्रसार!

📰 ४९८ व्या रविवारची सामूहिक वंदना व धम्मचर्चा उत्साहात संपन्न
अंबाजोगाई, १३ जुलै – संघर्षभूमीवर दर रविवारी होणारी सामूहिक वंदना यंदा ४९८ व्या आठवड्यातही उत्साहात पार पडली. यावेळी ‘पंचशील’ या विषयावर विशेष धम्मसंवाद घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून, सामूहिक वंदना, २२ प्रतिज्ञा व अनापान सती ध्यानाने झाली.
प्रा. डॉ. गणेश सुर्यवंशी यांनी 'पंचशील' या विषयावर विचार मांडले. त्यांनी पंचशील हे केवळ वैयक्तिक शिस्त नव्हे तर आरोग्य, सकारात्मक जीवनशैली आणि प्रगत समाजनिर्मितीसाठी आवश्यक असल्याचे सांगितले.




पंचशील आचरणावरही चर्चा झाली. कार्यक्रमाचा समारोप *‘सरणत्तय गाथे’*ने करण्यात आला.
या वेळी ॲड. शाम तांगडे, डॉ. किर्ती राज लोणारे, विश्वनाथ सावंत, बलभीम बनसोडे, सुभाष घाडगे, मुरलीधर कांबळे, पंकज भटकर आदींची उपस्थिती होती.

## लहान मुलांचे सदर ! चला रंग भरू या!



## ज्ञानमंजुषा – त्रिपिटक वार्तेतील लेखांवर आधारित प्रश्नसंच (साप्ताहिकातील लेखांवरून तयार केलेले अभ्यासपूर्ण प्रश्न)

🟣 भाग 1: रिकाम्या जागा भरा (FILL IN THE BLANKS):

1. सम्राट अशोक यांनी धम्माचा प्रचार करण्यासाठी __________ आणि __________ लिपींचा उपयोग केला.
2. नालंदा विश्वविद्यालयाचे प्रसिद्ध कुलगुरू __________ होते.
3. पालि भाषा ही __________ प्राकृतशी संबंधित आहे.
4. तिपिटक मध्ये __________, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक हे तीन भाग असतात.
5. बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी सम्राट अशोक यांनी कोरलेल्या शिलालेखांना __________ असे म्हणतात.

🟢 भाग 2: बरोबर पर्याय निवडा

1. खालीलपैकी कोणती भाषा तिपिटक लिहिण्यासाठी वापरली गेली?
A) संस्कृत, B) पालि,
C) हिंदी, D) प्राकृत

2. नालंदा विश्वविद्यालय कोठे स्थित होते?
A) गुजरात, B) मध्यप्रदेश
C) बिहार, D) कर्नाटक

3. सम्राट अशोक कोणत्या धर्माच्या प्रचारासाठी प्रसिद्ध आहेत?
A) जैन, B) हिंदू
C) बौद्ध , D) शीख

4. बौद्ध अभ्यासात "पटिपत्ती" म्हणजे काय?
A) ग्रंथांचे पाठ, B) अभ्यासक्रम
C) आचरण, D) परीक्षा

5. ‘धर्मगुंज’ हे कोणत्या विश्वविद्यालयाचे ग्रंथालय होते?
A) विक्रमशिला, B) तक्षशिला
C) नालंदा, D) वल्लभी

हे साप्ताहिक मालक, संपादक व प्रकाशक – अनिल आनंद सुरडकर | यांनी मुद्रक – जितेंद्र महादेव रसकर | मुद्रण – श्री समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, पुणे – ४११००२ येथे छापून | प्रकाशन पत्ता – हाउस नं. २, बिल्डिंग नं. ५, सर्वे नं. ०८, सातववाडी, हडपसर, पुणे – ४११०२८ येथून प्रकाशित केले |
RNI.NO – MHMUL/25/A1620 | MO.NO : +91 8805118839 / सर्व कायदेशीर बाबी पुणे न्याय क्षेत्रात येतील | "या अंकात प्रसिद्ध झालेले बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही."